Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 16 July 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ जूलै २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

आधार प्राधिकरणानं ७ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वयाच्या मुलांच्या पालकांना बायोमेट्रिक प्रमाणीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याचं आवाहन केलं आहे. जर हे अपडेट वेळेवर केलं नाही, तर संबंधित मुलांचा आधार क्रमांक रद्द होण्याची शक्यता आहे, असं प्राधिकरणानं स्पष्ट केलं आहे.

****

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या एकूण निर्यातीत ६ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ती २१० अब्ज पेक्षा जास्त असल्याचं वाणिज्य आणि उद्योग सचिव सुनील बर्थवाल यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं माध्यमांशी बोलत होते. जून महिन्यात देशाच्या आयातीत तीन पूर्णांक ७१ टक्के घट होऊन ती ५३ अब्ज ९२ कोटी डॉलर्सवर आली. तर, व्यापारी आणि सेवा क्षेत्राची एकूण निर्यात ६७ अब्ज ९८ कोटी डॉलर्सवर पोहोचली, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी काल उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची नवी दिल्लीत भेट घेतली. येत्या २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज उत्तम व्हावं ही विरोधी पक्षाची इच्छा आहे. यंदाच्या अधिवेशनात जनतेसाठीच्या अनेक धोरणात्मक, राजकीय, सामाजिक- आर्थिक विषयांवर चर्चा होणं आवश्यक असल्याचं खरगे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

****

लोकमान्य टिळक यांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

लातूर जिल्ह्यातल्या एकुर्गा गावातल्या जिल्हा परिषद शाळेत आठवीच्या वर्गाला मान्यता नसल्यामुळे शाळेतल्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या दालनाबाहेर काल ठिय्या आंदोलन केलं. रात्री उशिरापर्यंत हे विद्यार्थी अशाच पद्धतीने बसून होते. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला यश आलं असून, शिक्षणाधिकार्यांनी या शाळेत आठवीच्या वर्गाला मान्यता देत असल्याचं पत्र दिल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

अकोला जिल्ह्याला जिनिंग आणि प्रेसिंगसाठी केंद्राचा विशेष उल्लेखनीय पुरस्कार मिळाला आहे. कापूस उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील अकोल्याची प्रगती आणि औद्योगिक विकास यामुळे हा पुरस्कार मिळाला आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या वतीने जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अकृषी क्षेत्रात पुरस्कार मिळवणारा अकोला हा महाराष्ट्रातला एकमेव जिल्हा ठरला आहे. हा पुरस्कार मिळाल्यामुळे इथल्या कापूस उत्पादनांना राष्ट्रीय ओळख मिळाली असून, त्याचा स्थानिक उद्योजकांना लाभ होईल, असं जिल्हाधिकारी कुंभार म्हणाले.

****

लातूर शहरातल्या नाना-नानी पार्क आणि विलासराव देशमुख पार्क मधली अस्वच्छता, असुविधेविरोधात प्रभुराज प्रतिष्ठान आणि नाना नानी ग्रुपच्या वतीने महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर तसंच आयुक्तांच्या दालनात हातात दिवे घेऊन आंदोलन करण्यात आलं. दिव्याखाली अंधार असल्यासारखा महापालिकेचा कारभार असल्यामुळे हातात दिवे घेऊन हे आंदोलन करत असल्याचं प्रतिष्ठानचे अजय कलशेट्टी यांनी सांगितलं.

****

राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर कायम आहे. रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोर धरला असून खेडमधली जगबुडी, संगमेश्वरमधली शास्त्री आणि राजापुरातली कोदवली या तीन नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. खेड तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटात काल दरड कोसळली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून, जिल्ह्यातल्या सर्वच नद्या दुथडी भरून वाहत आहेत. सावंतवाडी तालुक्यात आंबेगाव इथं पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानं एका तरुणाचा मृत्यू झाला.
रायगड जिल्ह्यातही आंबा, कुंडलिका आणि सावित्री नदीने धोका पातळी ओलांडल्याने नागोठणे, रोहा आणि महाड परिसरात पुरपरिस्थिती आहे. काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनाही घडल्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने किल्ले रायगडावर जाणारा पायरी मार्ग १५ ऑगस्ट पर्यंत बंद केला आहे.
पुणे आणि परिसरातही सकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. नाशिक जिल्ह्यात गंगापूर धारण समूहातली सहा धरणं पूर्ण क्षमतेने भरली आहेत. सातारा जिल्ह्यातल्या कोयना धरणातून कालपासून विसर्ग सुरू आहे, तर सांगलीतील वारणा धरणातून होणारा विसर्ग वाढवण्यात आल्यानं वारणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. कोल्हापूरातही गेले दोन दिवस पावसानं जोर धरला आहे. पंचगंगा नदीची पाणी पातळी आठ फुटानं वाढली असून, जिल्ह्यातले ३२ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.
कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी आज मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

****

गोंदिया जिल्ह्यात विविध पोलिस ठाणे हद्दीत जप्त केलेल्या चार क्विंटल ६८ किलो गांजाची नागपूर इथं विल्हेवाट लावण्यात आली. बुटीबोरी इथल्या औद्योगिक वसाहतीतल्या महाराष्ट्र एनव्हायरो पावर लिमिटेड इथं इन्सीनरेशन पद्धतीचा वापर करून गांजा नष्ट करण्यात आला.

****